# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय
दि. २६/०४/२०२२

**<u>मा. महासभा दि. २९/०४/२०२२</u>**
**पुरक घोषणा**

प्रति,
सन्मा. श्री./श्रीम. ------------------------------------------
नगरसेवक/नगरसेविका
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील अनुसूची "ड" प्रकरण २ नियम १ (ज) अन्वये दिनांक २९/०४/२०२२ रोजी आयोजित केलेल्या मा. महासभेच्या विषयपत्रिकेमध्ये पुढील विषय समाविष्ट करणेची पुरक घोषणा करण्यांत येत आहे.

| प्र. क्र. | विषय |
|---|---|
| १७ | सन्मा. सदस्या श्रीम. निला सोन्स यांचा दिनांक २२/०४/२०२२ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>आरक्षण क्र. 305 (बगीचा) विखंडीत केलेल्या प्रस्तावाबाबत माहिती व न्यायप्रविष्ट असलेल्या जागेवर सुरु असलेल्या बांधकामावर स्थगिती आणून नागरीकांकरीता उद्यानाचा विवादीत भागावर नागरी सुविधा सुरु करणेबाबत. |
| १८ | सन्मा. सदस्या श्रीम. गिता भरत जैन यांचा दिनांक २५/०४/२०२२ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>मलनि:सारण केंद्राबाबत. |

जा.क्र. मनपा/नगसचिव/३४/२०२२-२३
दि. २६/४/२०२२.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

TM

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व.इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)
ता.जि.ठाणे-४०१ १०१,दुरध्वनी क्र.०२२-२८१९२८२८, Email :- mbmc.pro2012@gmail.com
जनसंपर्क विभाग

जा.क्र.मनपा/जनसंपर्क/ ३४ /२०२२-२३

दि.:- २८/ ४ /२०२२

प्रति,

मा.संपादक/जाहिरात व्यवस्थापक
दैनिक/~~साप्ता~~. -- हिंदी न्यूज मुंबई

---------------------------------------

---------------------------------------

विषय :- वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयांनुसार आपणांस कळविण्यात येते की, सोबत जोडलेली मिरा भाईंदर महानगरपालिकेची जाहिरात दि.२७/ ४ /२०२२ रोजी वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात यावी.

जाहिरात प्रसिध्दीकरिता सुचना :-

१) सदर जाहिरात हि शासकिय दराप्रमाणे प्रसिध्द करणे, आपणांस बंधनकारक राहील.

२) सदर जाहिरातीत १० फॉन्टपर्यंतच्या साईजच्या व कमीत-कमी जागेचा वापर करुन जाहिरात प्रसिध्द करावी.

३) सदर जाहिरात प्रसिध्द करतेवेळी महानगरपालिकेचा लोगो प्रसिध्द करणे आवश्यक राहील.

४) सदर जाहिरातीत www.mbmc.gov.in या महानगरपालिकेच्या वेबसाईटचा उल्लेख करावा.

५) जाहिरात प्रसिध्द करतेवेळी जनसंपर्क विभागातील जावक क्रमांकाचा उल्लेख करावा.

६) जाहिरातीत छपाई चुक झाल्यास, आपणांस विनामुल्य पुढील अंकांत जाहिरात प्रसिध्द करणे बंधनकारक राहील.

७) जाहिरात प्रसिध्द केलेबाबत वृत्तपत्राच्या चार प्रती दुस-या दिवशी कार्यालयात सादर करणे आवश्यक राहील.

८) जाहिरात प्रसिध्द केलेले वर्तमान पत्राचे बिल १५ दिवसांत या कार्यालयास सादर करावे.

९) पाठविलेल्या आर.ओ. मध्ये कुठलाही फेरफार करु नये.

१०) पाठविलेला आर.ओ. आपल्याच वृत्तपत्राच्या नावानिशी पाठविला आहे, याची पुर्ण खात्री करावी व त्यानंतरच वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करावी.

११) काही शंका असल्यास जनसंपर्क विभागाशी संपर्क करावा.

वरील सुचनांचे अधीन राहून, काटेकोरपणे पालन करणे आपणांस बंधनकारक राहील.

(राजकुमार घरत)
प्र.जनसंपर्क अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

सोबत :- जाहिरात